फोन. न. (2462) 229242,, 229243
फॅक्स नं. (2462) 229574

Phone : (02462) 229242, 229243
Fax (02462) 229574

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
*"ज्ञानतीर्थ" विष्णुपुरी.*
**नांदेड - ४३१ ६०६.**

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY,**
*"Dnyanteerth" Vishnupuri*
**NANDED – 431 606 (MH.)**

जावक क्रं. शैक्षणिक/परिपत्रक/2011–2012/2914 Date : 05/03/2012

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
**प्रस्तुत विद्यापीठ.**

विषय :- यु.जी.सी. विनियम ३० जुन २०१०, महाराष्ट्र शासन व विद्यापीठ परिनियमानुसार महाविद्यालयात पद भरतीची प्रक्रिया पुर्ण करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयातील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल, संचालक शारीरिक शिक्षण इत्यादी पदभरती करताना आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर सेवाशर्ती विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम २०१० मध्ये स्पष्ट केलेल्या आहेत. त्यास दिनांक १८ सप्टेबर २०१० रोजी या अटी व शर्ती भारताच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ फेब्रुवारी २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार ते पुर्वलक्षी प्रभावने लागु केलेले आहेत. तरी त्यानुसारच पदभरतीची कार्यवाही करावी.

विद्यापीठ परिनियम 163(1) नुसार शैक्षणिक वर्षाअखेर महाविद्यालयाने पुर्णवेळ तासिकांची पदमान्यता झालेला कार्यभार विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे. तरी शैक्षणिक वर्ष पुर्ण होताच शिल्लक कार्यभार विद्यापीठास विनाविलंब कळवावा व शिल्लक कार्यभारानुसार नव्याने पदभरती करण्यासाठी मा.सहसंचालक कार्यालयाकडून पदमान्यता घेण्याची प्रक्रिया लगेच चालू करावी. याबाबतची कल्पना मा.सहसंचालक यांना कळविलेली आहे. विद्यापीठ परिनियम 167(f)(ix) नुसार महाविद्यालयाने पदभरतीची प्रक्रिया २० जून पुर्वीच करणे आवश्यक आहे. कारण शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीपासूनच विद्यार्थ्यांना शिक्षक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तरी पद मान्यता व जाहीरात मसुदा मान्यता, विद्यापीठ निवड समिती त्वरीत घेऊन पुढील कार्यवाही करावी. विद्यापीठात आयोजित प्राचार्यांच्या बैठकीत या संदर्भात चर्चा झालेलीच आहे.

महाविद्यालयाकडून जाहीरात प्रकाशित करताना विद्यापीठाने दिलेल्या अर्जाच्या नमुन्यानुसारच अर्ज मागवावेत अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जाहीरात प्रकाशित झाल्यावर पात्र उमेदवारांच्या अर्जाची छाननी परिनियम 165(1),(2),(3) नुसार केली जाईल. छाननी समितीने पात्र व अपात्र उमेदवारांची यादी यु.जी.सी.रेग्युलेशन २००९ व २०१० च्या विनियमाप्रमाणे करावयाची आहे व फक्त पात्र उमेदवारांनाच मुलाखतीचे पत्र द्यायचे आहे. छाननी समितीचा अंतीम अहवाल मुलाखतीच्यावेळी विद्यापीठ निवड समितीसमोर सादर करूनच मुलाखत प्रक्रिया पूर्ण करावी. पात्र उमेदवारांना मुलाखत पत्र पंजिकृत पोंच पावती डाकने (Registered A.D.) मुलाखत दिवसाच्या किमान पंधरा दिवस अगोदर

मागे पहा...२..

उमेदवारांना पाठवावीत. साध्या पोस्टाने, स्पिड पोस्ट अथवा कुरिअरने मुलाखत पत्र पाठवू नयेत. तसे आढळून आल्यास निवड प्रक्रिया पूर्ण होवूनही मान्यतेची प्रक्रिया पूर्ण केली जाणार नाही. अर्जाची छाननी, मुलाखत पत्र पाठविणे व नियमानुसार निवड करणे या संदर्भात महाविद्यालय प्रशासन व महाविद्यालयाचे व्यवस्थापन जबाबदार राहील.

शासन निर्णय क्रमांक एसयुके २०११/(५५४/११)-विशि-१, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी, २०१२ नुसार विहीत केलेल्या निवड समितीमध्ये शासन प्रतिनिधी म्हणून विभागीय सहसंचालकांचा समावेश करण्यात यावा. शासन प्रतिनिधी उपस्थित नसतांना केलेली निवड अवैध ठरविण्यात येईल.

निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यावर विद्यापीठ परिनियम 167(f)(vi) नुसार निवड समितीचा अहवाल दोन दिवसाच्या आत विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम निवड समितीच्या अहवालास (प्रक्रियेस) विद्यापीठाची मान्यता घेण्याचा प्रस्ताव विद्यापीठात सादर करावा. विद्यापीठाकडून निवड प्रक्रियेस मान्यता मिळाल्यानंतरच संबंधितास नियुक्ती आदेश देवून रूजू करुन घेण्याची प्रक्रिया करावी. जर निवड समितीकडून उमेदवार निवडीची प्रक्रिया नियम, परिनियमानुसार झालेली नसल्यास मा.कुलगुरूंच्या मान्यतेने सदर निवड प्रक्रिया परिनियम 167(f)(vii) नुसार रद्द करण्यात येईल.

निवड प्रक्रियेस विद्यापीठाकडून मान्यता मिळाल्यावर संबंधितास नेमणूक आदेश देताना विद्यापीठ अनुदान आयोगाचे विनियम ३० जून २०१० प्रमाणे एक वर्षाचा परिविक्षाधीन कालावधीचा उल्लेख करूनच नेमणूक आदेश देण्यात यावेत व संबंधित उमेदवार रूजू होताच परिनियम 167(xii) नुसार प्राचार्यांनी नवनियुक्ती उमेदवाराचा समावेश केलेली स्टाफ फाईल विनाविलंब विद्यापीठास सादर करावी. तसेच, परिविक्षाधीन कालावधी पुर्ण करणा-या शिक्षकास सेवेत कायम करण्याची कार्यवाही परिनियम 177(1) नुसार संस्थेकडून त्वरीत पुर्ण करावी अन्यथा ते परिनियम 176(4)(c) नुसार सेवेत कायम राहतील याची नोंद घ्यावी.

तरी महाविद्यालयातील निवड प्रक्रिया २० जून पुर्वी करण्याच्या कार्यवाहीची प्रक्रिया हे पत्र प्राप्त होताच सुरू करावी. मे महिन्यानंतर कोणत्याही स्थितीत निवड समिती दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,<br>
स्वा/-<br>
संचालक<br>
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ